महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : १४४२(अ)/मशिसेमविप/२०१७/२४ दिनांक:- ०१ एप्रिल, २०२२

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय :- महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब मर्यादित विभागीय परीक्षा-२०१७**
**लेखी परीक्षेचा निकाल**
**संदर्भ :- जाहिरात क्रमांक - ४०/२०१७**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक १३ ऑगस्ट, २०१७ रोजी घेण्यात आलेल्या "**महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब मर्यादित विभागीय परीक्षा-२०१७**" चा लेखी परीक्षेचा निकाल **दिनांक ०१ एप्रिल, २०२२** रोजी जाहीर करण्यात आला आहे. सदर लेखी परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाच्या याद्या व प्रस्तुत परीक्षेची गुणांची सीमारेषा उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२.** प्रस्तुत लेखी परीक्षेचा निकाल मा. न्यायालय / मा. न्यायाधिकरण येथे दाखल विविध न्यायिक प्रकरणांमधील न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात येत आहे.

**३.** अर्हताप्राप्त ठरलेल्या सर्व उमेदवारांना त्यांनी त्यांच्या आवेदनपत्रात नमूद केलेल्या दाव्याच्या अनुषंगाने त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रावरून तपासण्याच्या अधीन राहुन मुलाखतीसाठी बोलविण्यात येत आहे. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्याचे आढळून आल्यास तसेच अर्जातील दावे तपासणीअंती ग्राह्य नसल्याचे आढळून आल्यास संबंधित उमेदवारांची उमेदवारी मुलाखतीच्या वा नंतरच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**४.** सदर उमेदवारांनी आवश्यक सर्व मूळ प्रमाणपत्रे व शासनाच्या संबंधित आस्थापना अधिकारी / कार्यालय प्रमुख / विभाग प्रमुखांकडून प्रमाणित करुन देण्यात आलेल्या परिशिष्टाची प्रत तसेच प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतींसह (२ संच) मुलाखतीकरिता उपस्थित रहावे. (उमेदवारांनी मुलाखतीवेळी सादर करावयाचे परिशिष्ट आयोगाच्या संकेतस्थळावर 'Downloads' शीर्षकांतर्गत अनु. क्र. ८ वर उपलब्ध आहे.) उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्याबाबतचे पत्र त्यांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करून दिले जाईल.

**५.** सदर लेखी परीक्षेच्या निकालानुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांचा मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येईल. मुलाखत कार्यक्रमानुसार उमेदवारांनी मुलाखतीकरिता विहित दिनांकास वेळेवर स्वखर्चाने उपस्थित रहावे.

**६.** प्रस्तुत परीक्षेकरिता उपस्थित ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०१ एप्रिल, २०२२**

**(वि. शं. देशमुख)**
**उपसचिव(परीक्षोत्तर-अराजपत्रित)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**